महानगरपालिका निवडणुकांची प्रारुप प्रभाग रचना शासन राजपत्रात प्रसिध्द करण्याचे अधिकार संबंधित महानगरपालिका आयुक्तांना प्रदान करणेबाबत...

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक :-रानिआ/मनपा-२०१४/प्र.क्र.२६/का.५,
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२
दिनांक :- ०६/०२/२०१५.

## आ दे श

ज्याअर्थी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए अन्वये राज्य निवडणूक आयोगावर महानगरपालिकांच्या निवडणुकांची जबाबदारी सोपविलेली आहे.

आणि ज्याअर्थी, मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ५अ, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ५ तसेच राज्य निवडणूक आयोगाच्या दिनांक १९/१/२००५ व दिनांक ३ मे, २००५ च्या आदेशामधील तरतुदीनुसार महानगरपालिकेच्या निवडणुकांकरिता प्रभाग रचनेचे प्रारुप राज्य निवडणूक आयुक्त शासन राजपत्रात प्रसिध्द करतील अशी तरतूद आहे.

आणि ज्याअर्थी सदर प्रारुप प्रभाग रचनेच्या प्रसिध्दीचे अधिकार संबंधित महानगरपालिका आयुक्त यांना प्रदान करणे आवश्यक झाले आहे.

त्याअर्थी राज्य निवडणूक आयोग भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५, १८अ(४), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ५ व १४ (४) अन्वये मिळालेल्या व इतर प्राप्त अधिकारांचा वापर करून पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत:-

राज्य निवडणूक आयोगाने प्रारुप प्रभाग रचनेच्या प्रस्तावास मान्यता दिल्यानंतर व आरक्षणाची सोडत काढण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर नेमून दिलेल्या दिवशी संबंधित महानगरपालिका आयुक्त प्रारुप प्रभाग रचनेची अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द करतील.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( नि. ज. वागळे )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

प्रति,

प्रधान सचिव( २ ), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व महानगरपालिका आयुक्त
राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी
निवड नस्ती.

D:\Corpn २०१४-१५\Election २०१४-१५ Feb..docx